महाराष्ट्र शासन

# औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

माहितीचा अधिकार

कामगार भवन,५ वा मजला, ब्लॉक-ई, सी-20, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पुर्व), मुंबई-४०००५१

फोन नं.२६५७२५०४/०९/२२/५८, Email : dirdish.mum-mh@gov.in, Website: .mahadish.in

क्र. औ.सु.वआ./वैद्यकीय/ ८७१०-९३ /१९, दि. - 3 AUG 2019

<u>आदेश क्र :</u> ७८/१९

**संदर्भ :- १) डॉ. अंजली पाटील,पाटीलस् क्लिनिक , द्वारा अशोक एस. भोसले, सर्वे नं. ५०८, ड्रायवर कॉलोनी, हनुमान नगर, थेरगाव, पुणे-४११०३३** यांनी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांच्याकडे केलेला अर्ज दि: ०९.१०.२०१८.

२) शासनाचे उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे **पत्र क्र.एफएसी-२०१९/प्र.क्र.२४४/ काम-४, दिनांक – ३०.०७.२०१९.**

कारखाने अधिनियम १९४८ (१९४८ च्या त्रेसष्ट ) च्या कलम १०(२) अनुसार प्रदान केलेल्या शक्तिचा वापर करून मी डॉ. सु. शा. घाटकर, प्रमाणक शल्य चिकित्सक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, **डॉ. अंजली आर. पाटील,** यांना खालील अटींच्या अधीन राहून **पुणे** जिल्ह्यासाठी आदेशाच्या दिनांकापासून **दोन वर्षासाठी** प्रमाणक शल्यचिकित्सक म्हणून प्राधिकृत करत आहे.

अटी

१. प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम १०(४)(अ)(ब)(क) व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ च्या नियम १८ च्या तरतुदीनुसार कर्तव्ये पार पाडावीत.

२. प्रमाणक शल्यचिकित्सक हा एखाद्या कारखान्याचा भोगवटादार किवा त्या कारखान्यात किंवा त्यात चालणाऱ्या कोणत्याही प्रक्रियेत किंवा धंद्यात किंवा त्या कारखान्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही पेटंटात, यंत्रसामुग्रीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने त्यांचा हितसंबंध असलेला किंवा कारखान्यात फॅक्टरी मेडिकल ऑफिसर म्हणून कार्यरत नसावा.

३. प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी त्यांना प्राधिकृत केलेल्या कालावधीनंतर काम करू नये. तसेच कार्यक्षेत्राच्या बाहेर त्यांच्या अधिकाराचा वापर केल्यास सदर आदेश रद्द करण्यात येईल.

४. **प्रमाणक शल्य चिकित्सक यांनी केलेल्या तपासणी बाबत मासिक अहवाल फोटोग्राफसह संचालनालयास पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत न चुकता सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात सादर करावा व एक प्रत संबंधित कारखाने व्यवस्थापक यांना द्यावी.**

५. प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी तपासणी केल्यानंतर प्रमाणपत्रात खालील प्रमाणे नमूद करून किंवा शिक्का मारून स्वाक्षरी करावी.

( स्वाक्षरी )

कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम १०(२) प्रमाणे

**पुणे** जिल्ह्याकरिता दिनांक- ..................... पासून.....................................पर्यंत.

प्राधिकृत प्रमाणकशल्यचिकित्सक क्र **ACS24-AP /2012**

६. यापुढे वैद्यकीय तपासणीसाठी शासन जे दर ठरवून देईल तेच दर आकारावेत.

७. कारखान्यातील  कामगारांची वैद्यकीय तपासणी करताना प्राधिकृत प्रमाणक शल्यचिकित्सक स्वतः हजर राहिले पाहिजे.

८. कारखान्यातील कामगारांच्या वैद्यकीय तपासणीचे वेळापत्रक संचालनालयाच्या संबंधित कार्यालयास कारखान्याचे नाव व पत्ता यांच्यासह किमान एक दिवस आधी  सादर करण्यात यावे.

९. प्रमाणक शल्यचिकित्सक यांनी दिलेल्या माहीतीस काहीही बदल झाल्यास त्यांनी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना त्याबाबत एक महिन्याच्या आत कळविणे बंधनकारक राहील.

१०. कारखाने अधिनियम १९४८ मधील कलम १८ ए मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव नस्ती क्र. एफएसी-२०११/प्र.क्र. २८१/कामगार -४, यानुसार विधी व न्याय विभागाला सादर केला आहे. यामध्ये नवीन निकष आणि नियम प्रस्तावित आहेत. प्रमाणक शल्यचिकित्सकांच्या प्राधिकृत करण्यात आलेल्या कालावधीत जर या प्रस्तावाला मान्यता मिळाली, तर त्यातील नवीन निकष व नियमांची पूर्तता करणे बंधनकारक असेल.

११. कारखाने अधिनियम १९४८ आणि महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ मध्ये कोणतेही बदल झाल्यास ते बदल प्राधिकृत प्रमाणक शल्यचिकित्सकास बंधनकारक असतील.

१२. वरील कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास प्रमाणक शल्यचिकित्सक म्हणून केलेली प्राधिकृती रद्द करण्यात येईल.

१३. प्राधिकृतीच्या नुतनीकरणाचा अर्ज कालावधी संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर विहित नमुन्यात सर्व कागदपत्रे व अर्जशुल्कासह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना सादर करावे.

आदेश: दिनांक - 3 AUG 2019 पासून दिनांक- 2 AUG 2021 पर्यंत.

डॉ. सु. शा. घाटकर,
प्रमाणक शल्यचिकित्सक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्राधिकृत प्रमाणकशल्यचिकित्सक क्र.: **ACS24-AP /2012**

**नोट-** भविष्यात पत्रव्यवहार करताना वरील प्राधिकृत प्रमाणक शल्यचिकित्सक क्रमांकाचा उल्लेख करावा.

प्रत माहितीसाठी सादर-

१. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर /सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पुणे-१ / २ / ३,
३. डॉ. अंजली पाटील, डॉ.आर.एन पाटीलस् सुरज हॉस्पिटल,पाम बीच मार्ग समोर, प्लॉट- 1 व 1A, सनपाम व्यु बिल्डींग, सेक्टर-१५, सानपाडा, नवी मुंबई- ४०० ७०५
४. आदेश वही.